# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः16.11.2024** **वारःशनिवार**

---

**ठळक बातम्या**

• राज्यात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला; सर्वच पक्षांच्या नेत्यांकडून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी

• महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा निवडणूक जाहीरनामा राज ठाकरे यांच्याकडून प्रसिद्ध

• ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांना; दीडशेव्या जयंतीनिमित्त देशभरातून अभिवादन आणि

• दक्षिण आफ्रिकेविरुद्ध टी-ट्वेंटी मालिकेत भारताचा विक्रमी विजय

आता सविस्तर बातम्या

**महायुती**

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अवघे दोन-तीन दिवस शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे राज्यात प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रचारसभा, प्रचार फेऱ्या होत असून उमेदवार आणि कार्यकर्ते बैठका आणि मतदारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेण्यावर भर देत आहेत. कालही विविध पक्षांच्या प्रचारामुळे राज्यातलं वातावरण ढवळून निघालं. जनतेला समर्पित असलेलं महायुतीचं सरकार पुन्हा सत्तेत आणा असं आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल हिंगोलीत जाहीर सभेत केलं. काश्मीरमधे 370 कलम पुन्हा लागू करण्याचं आश्वासन काँग्रेस देत आहे, पण त्यांना हे कदापि शक्य होणार नाही, अशी टीका शहा यांनी केली. अमित शहा यांनी काल यवतमाळमध्येही जाहीर सभा घेत महाविकास आघाडीवर जोरदार टीका केली. वर्धा नांदेड रेल्वे योजना या 5 वर्षात पूर्ण करणार, नदी जोड योजनेमध्ये पैनगंगा नदीचा समावेश करून सिंचन व्यवस्था वाढविणार, नागपूर मुंबई समृद्धी मार्ग उमरखेडला जोडणार असं आश्वासन शहांनी दिलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची सभा गडचिरोली जिल्ह्यातल्या आष्टी इथं झाली. गडचिरोलीमधली जनता भाजपा महायुतीला नक्की विजयी करेल असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सोयाबीन खरेदी करताना किमान आधारभूत किंमतीतली तफावत दूर करण्यासाठी भावांतर योजना लागू करण्याचं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं. नांदेडमधल्या प्रचारसभेत ते काल बोलत होते. नांदेडला अडीच हजार कोटींचा निधी दिल्याचं त्यांनी सांगितलं. भाजपा नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांची काल पुणे शहरात विविध ठिकाणी तसंच सातारा जिल्ह्यात कराड इथं जाहीर सभा झाली. पुढील पिढीच्या अस्तित्वासाठी ही निवडणूक महत्वाची आहे असं मत त्यांनी व्यक्त केलं. यावेळी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांवर जोरदार टीकास्त्र सोडलं. राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अकोले तालुक्यात सभा झाली. धुळे जिल्ह्यातल्या शिंदखेडा इथं भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी जाहीर सभा घेतली आणि महायुतीच्या संकल्पपत्रातील आश्वासनांची सविस्तर माहिती दिली.

**महा विकास आघाडी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी कॉंग्रेसवर करत असलेले आरोप जनतेची दिशाभूल करणारे आहेत, असं मत काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी काल मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आल्यानंतर सोयाबीनला 7 हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊ असंही रमेश चेन्नीथला यांनी जाहीर केलं. राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची काल इचलकरंजीमध्ये सभा झाली. सत्ता बदलण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी करा, असं ते म्हणाले. शरद पवार यांनी काल सांगली जिल्ह्यातल्या तासगाव कवठेमहांकाळ इथं आणि नंतर कोल्हापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा घेतल्या. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी काल पुण्यात कोथरुडमध्ये कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं.

**मनसे**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल मुंबईत पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित केला. या जाहीरनाम्याच्या पहिल्या भागात मूलभूत गरजा, दुसऱ्या भागात दळणवळण, वीज, पाणी नियोजन, घनकचरा व्यवस्थापन, पर्यावरण जैवविविधता यांचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या भागात प्रगतीच्या संधी आणि राज्याचं कृषी धोरण आणि चौथ्या भागात मराठी अस्मिता हा विषय घेण्यात आल्याचं राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं. जाहीरनामा प्रसिद्ध करताना अनेकांनी आम्ही काय करू इतकच दिलं आहे. पण, आमच्या जाहीरनाम्यामध्ये आम्ही काय करू आणि कसं करू  या गोष्टी देखील समाविष्ट केल्या आहेत, असंही ते यावेळी म्हणाले. महाराष्ट्रात चौकाचौकात छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे आहेत. मग त्यांच्या मंदिरांची गरज काय? त्याऐवजी शिवरायांनी उभारलेले गडकिल्ले चांगले होणं महत्त्वाचं आहे, असं राज ठाकरे यावेळी म्हणाले.

**जनजागृती**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांसाठी विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबवले जात आहेत. जळगाव जिल्हयातल्या सर्व तालुक्यांमध्ये मॅरेथॉन स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होतं.

यवतमाळ जिल्ह्यात जिल्हा माहिती कार्यालयानं चित्रफित तयार केली आहे. एक एक मतदाराच्या मतदानानं लोकशाही समृध्द होत जाते, असा संदेश या लघुपटातून देण्यात आला आहे. सातारा जिल्ह्यात फलटण बसस्थानकावर पथनाट्य सादर करण्यात आले आणि मतदान प्रतिज्ञा घेण्यात आली. किर्लोस्करवाडी कारखान्यातल्या 500 पेक्षा जास्त कामगारांनी मतदान करण्याची प्रतिज्ञा घेतली. जत आणि तासगावमध्ये मानवी साखळी करून मतदानाचा संदेश देण्यात आला. रत्नागिरीत मच्छिमार व्यावसायिकांमध्ये मतदानाबद्दल जागृती करण्यासाठी मिरकरवाडा बंदराजवळ काल होड्यांची फेरी आयोजित करण्यात आली होती. यामध्ये दीडशे होड्या सहभागी झाल्या होत्या. यावेळी पोवाडे, शाहिरीमधूनही  जनजागृती करण्यात आली.

प्रसिद्ध अभिनेता पुष्कर श्रोत्री यानं मतदानाचं कर्तव्य बजावण्याविषयी शपथ  घेतली.

**नानक जयंती**

शिखांचे पहिले गुरू नानक यांची 555 वी जयंती काल देशभरात प्रकाशपर्व म्हणून साजरी झाली. राज्यात नांदेडच्या सचखंड गुरुद्वारासह सर्वच गुरुद्वारांमध्ये अखंडपाठ, किर्तन आणि प्रवचनांच्या भक्तीमय वातावरणात गुरूनानक देवजी यांचे संदेश आणि विचार समाज बांधवांना सांगण्यात आले. तसंच भाविकांनी लंगरचा लाभ घेतला. अहिल्या नगरमध्ये सकाळी पारंपरिक वाद्यांच्या गजरात फेरी काढण्यात आली होती.

**त्रिपुरारी पौर्णिमा**

कार्तिकी पौर्णिमा म्हणजेच त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त काल राज्यातल्या अनेक प्रमुख मंदिरांमध्ये तसंच नद्यांच्या घाटांवर दीपोत्सव साजरा करण्यात आला. दिव्यांचा उत्सव असलेल्या दीपावलीची सांगता या देवदिवाळीनं होते. या उत्सवाला मोठी परंपरा आहे. पुण्याच्या वेदाचार्य घैसास गुरुजी वेदपाठशाळेतही काल दीपोत्सव साजरा करण्यात आला. याबाबत अधिक माहिती देताना वेदमूर्ती घैसास गुरुजी म्हणाले.......

**बिरसामुंडा**

ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक बिरसा मुंडा यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त त्यांना देशभरात अभिवादन करण्यात आलं. बिरसा मुंडा यांची जयंती जनजाती गौरव दिन म्हणून साजरी करण्यात येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल बिहारमधल्या जमुई इथं बिरसा मुंडा जयंती महोत्सवाच्या निमित्तानं एका विशेष टपाल तिकिटाचं आणि एका नाण्याचं अनावरण केलं. या संपूर्ण वर्षभरात आदिवासी विकासाच्या अनेक योजना हाती घेण्यात येत आहेत. बिरसा मुंडा यांच्या जयंतीचं औचित्य साधून गृहमंत्री अमित

शहा यांच्या हस्ते काल नवी दिल्लीत बिरसा मुंडा यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. देशभरातल्या शैक्षणिक संस्था, कार्यालयांतही बिरसा मुंडा यांना अभिवादन करण्यात आलं.

**क्रिकेट**

जोहान्सबर्गच्या दी वाँडरर्स स्डेडियमवर रंगलेला चौथा आणि अखेरचा सामना जिंकत भारतीय संघानं दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका 3-1 अशी जिंकली. विविध विक्रम स्थापित झालेल्या या सामन्यात संजू सॅमसन आणि तिलक वर्मा या दोघांनी केलेल्या शतकाच्या जोरावर भारतानं 283 धावा केल्या. भारताची परदेशातील ही सर्वोच्च धावसंख्या ठरली. या दोघांनी तुफान फटकेबाजी करत सर्वात मोठी 210 धावांची भागीदारी रचण्याचा विक्रम केला. त्याचबरोबर एकाच टी-20 सामन्यात शतकी खेळी करून दाखवणारे पहिले फलंदाज ठरले आहेत.  संजू एकाच वर्षात तीन आंतरराष्ट्रीय टी२० शतक ठोकणारा पहिला तर तिलक सलग दोन आंतरराष्ट्रीय टी 20 शतक करणारा सॅमसननंतरचा दुसरा खेळाडू ठरला. ही दुसऱ्या गड्यासाठी झालेली आतापर्यंतची सर्वोच्च भागीदारी ठरली. धावसंख्येचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेचा संघ 148 धावांत आटोपला. गोलंदाजीत अर्शदीप सिंगनं 3, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी 2 बळी घेतले.

**पाऊस**

सातारा जिल्ह्यात शहरासह विविध भागात काल वीजांसह जोरदार पावसानं हजेरी लावली. सिंधुदुर्ग जिल्हयाच्या काही भागाला सलग दुसऱ्या दिवशी वीजांसह आलेल्या पावसानं झोडपून काढलं. या पावसामुळं भातशेतीचं नुकसान झालं आहे. सांगली जिल्ह्यातील मिरज, तासगाव आणि वाळवा तालुक्यात पाऊस झाला.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार**